# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:30.03.2024** **वार:शनिवार**

---

1. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना गव्हाच्या साठ्याची माहिती देण्याचे आदेश
2. सरकारी बाजारपेठ जेममध्ये 4 लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी
3. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस
4. युक्रेनचे परराष्ट्रमंत्री दिमित्रो कुलेबा यांचं दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी भारतात आगमन आणि
5. माद्रीद स्पेन मास्टर्स खुल्या बडमिंटन स्पर्धेत भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी या मिश्र जोडीचा उपांत्य फेरीत प्रवेश.

**गहू**

सरकारनं उत्पादकांना आपल्याकडच्या गव्हाच्या साठ्याची माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशामधील व्यापारी, ठोक तसच किरकोळ विक्रेते, मोठे घाऊक व्यापारी आंनी उत्पादकांना येत्या 1 एप्रिलपासून पुढील आदेशापर्यंत आपल्याकडे असलेल्या गव्हाच्या साठ्याची संपूर्ण माहिती सरकारला देणं अनिवार्य असल्याचं काल ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं जाहीर केलं आहे. खाद्य सुरक्षाव्यवस्था ठेवणं, साठेबाजी आणि नियमबाह्य विक्रीवर रोख लावण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं सरकारनं सांगितलं. सर्व स्तरावरच्या संस्थांना आपल्याकडील तांदळाच्या साठ्याविषयी माहिती देण्यासंबंधी या आधीच सूचना केल्या गेल्या आहेत, नुसार प्रत्येक लहान मोठ्या व्यापाऱ्याला मंत्रालयानं तयार केलेल्या पोर्टलवर आपली नोंद करणं आणि आपल्याकडील गहू आणि तांदळाच्या साठ्याची माहिती देणं अनिवार्य आहे.

**जी ई एम**

जेम अर्थात सरकारी ई मार्केटमध्ये चालू वित्त वर्षात 4 लाख कोटी रुपयांची विक्रमी खरेदी झाली आहे. ही रक्कम मागील वित्त वर्षाच्या तुलनेमध्ये दुप्पट असल्याची माहित्ती काल नवी दिल्लीमध्ये जेमचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. के. सिंह यांनी पत्रकारांना दिली. यामुळे जेम पोर्टलची डिजिटल क्षमता आणि कार्यक्षमतेविषयी विश्वास व्यक्त होतो असंही ते यावेळी म्हणाले. सार्वजनिक खरेदीमध्ये दक्षता, पारदर्शकता आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय कारभार होत असल्याचं यावरून निदर्शनास येत आहे. जवळपास 50 टक्के योगदान हे एकूण व्यापारी मूल्यांचं असल्याचाही त्यानी यावेळी सांगितलं. स्थानिक व्यापाऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी म्हणजेच व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा एक उत्पादन, स्टार्टअपचा वापर करणं यासारख्या प्रयत्नांमुळे घरगुती उद्योग करणार्यांना समान संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांचा व्यवसाय वाढवण्याच्या संधी उपलब्ध करून देणं हा यामागचा उद्देश असल्याचं सिंह यांनी सांगितलं.

**नावे-माघारी-पहिला टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील आणि सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस गेल्या बुधवारी होती, त्यानंतर गुरुवारी अर्जांची छाननी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात बिहार आणि चार केंद्रशासित प्रदेशांसह 17 राज्यांमधील लोकसभेच्या 102 जागांसाठी 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्याचबरोबर सिक्कीममधील 32 विधानसभा मतदारसंघ आणि अरुणाचल प्रदेशमधील 60 विधानसभा मतदारसंघांसाठी एकच टप्प्यात मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात 17

राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांपैकी तामिळनाडू, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार बेटे आणि पुद्दुचेरी येथे एकाच टप्प्यात निवडणुका होत आहेत. बिहारमधील होळी आणि बिहार स्थापना दिनानिमित्त भारतीय निवडणूक आयोगानं अर्जाची अंतिम तारीख वाढवली आहे.

**<u>प्राप्तिकर विभाग</u>**

प्राप्तिकर विभागानं काँग्रेस पक्षाला 1823 कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या वसुलीसंबंधी नोटीस पाठवली आहे. प्राप्तिकर विभागानं सुरुवातीलाच पक्षाच्या खात्यातून 135 कोटी रुपये काढून घेतले आहेत जे पक्षाला खर्चासाठी मिळाले होते, असं पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. मुख्य विरोधी पक्षाला त्रास देण्यासाठी प्राप्तिकर विभागाला हाताशी धरून सत्ताधारी पक्ष हे काम करत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरील एका संदेशात म्हटलं आहे, तर प्राप्तिकर विभागावर आरोप करणं हे कॉंग्रेस पक्षाची हतबलता दर्शवतं असं भाजपनं म्हटलं आहे.

**<u>एस. जयशंकर</u>**

युक्रेनचे परराष्ट्र मंत्री दिमित्रो कुलेबा दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि युक्रेनचे त्यांचे समपदस्थ दिमित्रो कुलेबा यांनी काल नवी दिल्ली मध्ये झालेल्या एका बैठकीत रशिया आणि युक्रेन मध्ये सुरु असलेल्या संघर्षाविषयी आणि त्याच्या परिणामांविषयी चर्चा केली. आपापसातील संबंध तसच वैश्विक आणि क्षेत्रीय मुद्यांवरही चर्चा झाली असल्याचं एस. जयशंकर यांनी आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. द्विपक्षीय सहकार्यासह आणि परस्पर संबंध मजबूत करण्याविषयी भारताचं सहकार्य अधोरेखित केलं. युक्रेन परराष्ट्र मंत्र्यांच्या या दौऱ्यामुळं युक्रेनच्या युद्ध स्थिती संबंधी समजून घेण्याची संधी मिळाली तसचं गेल्या काही महिन्यात आपापसात विविध विषयांवर चर्चा होऊन द्विपक्षीय संबंधाना गती मिळाल्याचा एस. जयशंकर यांनी सांगितलं. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध वाढवणं त्यासाठी व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान आणि औद्योगिक, संरक्षण, कृषि, आरोग्य, संस्कृती आणि शिक्षण या विषयांवर दोन्ही मंत्र्यांमध्ये बैठकीदरम्यान समाधानकारक चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं कळवलं आहे. व्यापार, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक सहकार्यावर भारत-युक्रेन अंतर सरकारी आयोग आणि त्याच्या कार्य समूहांशी संबंधित मुद्द्यांवर दोन्ही मंत्र्यांमध्ये चर्चा झाली. या वर्षाच्या शेवटी सातवी आंतरसरकारी समितीची अर्थात आयजीसीची बैठक आयोजित करण्याच्या मुद्द्यांवर दोन्ही मंत्र्यांची सहमती झाली आहे.

**<u>भारतीय नौसेना</u>**

भारतीय नौसेनेच्या 2 जहाजांनी काल अरबी समुद्रामध्ये इराणच्या मासेमारी करणाऱ्या एका जहाजाचा समुद्री लूटमारीचा कट उधळून लावत ताब्यात घेतलं. हे जहाज सोकोत्रापासून जवळपास 90 मीटर दक्षिण पश्चिम दिशेला असून त्यावर 9 सशस्त्र चाचे असल्याची सूचना भारतीय नौसेनेला मिळाली होती त्यावरून ही कारवाई करण्यात आली. इराणी जहाज आणि त्याच्या चालक दलाला चाच्यांपासून वाचवण्यासाठी भारतीय नौसेनेचे प्रयत्न सुरु आहेत.

**<u>संघर्ष विराम</u>**

इस्त्राईलचे पंतप्रधान बेन्जामिन नेत्यानाहू यांनी हमासबरोबर युद्धविरामाची बोलणी पुन्हा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. येत्या काही दिवसामधे कतार आणि इजिप्त यांच्यामध्ये युद्धविरामाविषयी चर्चेमध्ये सहभागी होण्यासंबंधी इस्त्राईलच्या प्रमुख वार्ताहर आणि प्रतिनिधी मंडळाबरोबर बोलणी केली असल्याचंही नेत्यानाहू यांनी सांगितलं. त्यानाहू यांच्या कार्यालयातून काल ही माहिती दिली गेली. नेत्यानाहू यांची ही घोषणा म्हणजे हमास बरोबर सामंजस्य स्तरावर पोहोचण्याचा हा प्रयत्न असून, इस्त्राईलच्या कैद्याना सोडण्या ऐवजी गाझा मधील सैन्याच्या आक्रमणाला विराम देईल.

**<u>सेनेगल</u>**

आफ्रिकी देश सेनेगलच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत तिथले विरोधी पक्षाचे उमेदवार बासिरो दियोमाये फेय यांचा विजय झाल्याची घोषणा तिथल्या घटना परिषदेने केली आहे. यामुळे सेनेगल चे पाचवे राष्ट्रपती होण्याचा मान फेय यांना मिळणार

आहे. देशातील 100 टक्के मतदान केंद्रातून आलेल्या मत मोजणीद्वारे सेनेगलच्या सर्वोच्च न्यायालयाने हा अंतिम निकल जाहीर केला. त्यानुसार फेय यांना पहिल्या टप्प्यात 54 पूर्णांक 28 टक्के मते मिळाली आणि ते विजयी झाले तर माजी पंतप्रधान अमादौ बा यांना 35 पूर्णांक 79 टक्के मते मिळाली.

**<u>भारतरत्न</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुरमू आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात यावर्षी नुकतेच जाहीर झालेले भारतरत्न सन्मान प्रदान करणार आहेत. माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग आणि पीव्ही नरसिंह राव, बिहारचे माजी मुख्यमंत्री करपुरी ठाकूर आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ एम एस स्वामिनाथन यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान प्रदान करण्यात येईल. माजी उपपंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनाही भारतरत्न सन्मानाने गौरवण्यात येणार आहे.

**<u>महामार्ग बंद</u>**

जम्मू आणि काश्मीरच्या रामबन सेक्टरमध्ये मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि दरडी कोसळल्यामुळे आज सकाळी जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे रोहित बास्कोत्रा यांनी सांगितलं की, रामबन सेक्टरमधील दलवास, मेहड-कॅफेटिया आणि हिंगणीसह नाश्री आणि बनिहाल दरम्यान डझनभर ठिकाणी मुसळधार पावसामुळे भूस्खलन, चिखल आणि दगड खाली आल्यामुळे महामार्ग NH-44 बंद करण्यात आला. महामार्ग बंद झाल्यामुळे शेकडो वाहने नाश्री ते बनिहाल दरम्यान अडकून पडली आहेत. रस्ता दुरुस्तीची कामं पूर्ण होईपर्यंत महामार्गावरील प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**<u>स्पर्धा</u>**

माद्रीद स्पेन मास्टर्स खुल्या बडमिंटन स्पर्धेत काल भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी या मिश्र जोडीने इंडोनेशियाच्या लिसा अयु कुसुमावती और आणि रेहान कुशारजंतो या जोडीचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांनी हा सामना 21-14, 11-21, 17-21 अशा गुणांनी जिंकला. अंतिम सामन्यात स्थान निश्चित करण्यासाठी आता या भारतीय जोडीचा मुकाबला आज इंडोनेशियाच्या रिनोव रिवाल्डी आणि पिथा मेंटारी यांच्याशी होणार आहे. दरम्यान, अव्वल मानांकीत भारतीय खेळाडू पीव्ही सिंधू हिला महिला एकेरी सामन्यात काल थाईलंडच्या काटेथोंग हिच्याकडून 26-24, 17-21, 20-22 असा पराभव स्वीकारावा लागला

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**